मंत्री

ऊर्जा

महाराष्ट्र राज्य

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

*www.maharashtra.gov.in*

819

जा.क्र. मंत्री/ऊर्जा/व्ही.आय.पी./क्र. [redacted]

दिनांक : 04 APR 2020

**विषय — रविवार 5 एप्रिल 2020 रोजी रात्री राज्यातील नागरिकांना अखंडित व सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याबाबत.**

संदर्भ :- **1. सचिव ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार, यांचे 4 एप्रिल २०२० रोजीचे पत्र.**
**2. ऊर्जा मंत्रालय भारत सरकार यांची प्रेस नोट**

कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर, रविवार 5 एप्रिल 2020 रोजी भारताचे पंतप्रधान मा. श्री. नरेन्द्र मोदी यांनी रात्री नऊ वाजता संपूर्ण भारतात घरातील विजेचे दिवे बंद करून नऊ मिनीटांकरिता मेणबत्त्या, दिवे व मोबाईल टॉर्च पेटवायला सांगीतले आहे. हया संदर्भात आज दुपारी 2.39 मिनीटांनी केन्द्रीय ऊर्जा मंत्री (स्वतंत्र प्रभार) मा. ना. श्री. आर. के. सिंग यांनी मला फोन केला व मा. प्रधानमंत्री यांनी केलेल्या आवाहना संदर्भात माझेशी सविस्तर चर्चा केली. या आवाहना मध्ये पथदिवे, घरगुती उपकरणे जसे टि.व्ही., संगणक, फ्रिज आणि एअर कंडिशनर हे बंद करण्यात येणार नाहीत केवळ घरातले लाईट/दिवे बंद करण्याबाबत संदर्भीय क्रं. 2 च्या प्रेस नोट मध्ये व सचिव ऊर्जा मंत्रालय यांच्या पत्रात नमूद आहे. सदर दोन्ही पत्रे आपल्या माहितीसाठी सोबत जोडली आहेत.

त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील इलेक्ट्रिकल ग्रिडची सुव्यवस्था व ग्रिडचा बिघाड (Failure) टाळण्यासाठी तसेच नागरिकांना अखंडित, सुरळीत व पूर्ववत विजेचा पुरवठा ठेवण्याकरिता ऊर्जा विभाग, प्रामुख्याने महानिर्मीती, महापारेषण, महावितरण व राज्य भार प्रेषण केन्द्र यांनी अत्यंत काळजी घेणे गरजेचे आहे.

सदर कालावधीत, आकस्मिक परिस्थिती विचारात घेऊन महाराष्ट्रातील 2585 मेगावॅट स्थापित वीज क्षमतेच्या जलविदयुत केन्द्रांमधून आपल्याला तात्काळ महत्तम विजनिर्मीती करता येईल, जेणेकरून उदभवलेल्या परिस्थतीत पश्चिम ग्रिडचे संतुलन राखणे सुकर होईल. तरी या संदर्भात आपल्या स्तरावरून महानिर्मीती, महावितरण, महापारेषण तसेच राज्य भार प्रेषण केन्द्राच्या वरीष्ठ अधिका-यांना तातडीने निर्देश देण्यात यावेत.

तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल तात्काळ सादर करावा.

सहपत्र : वरीलप्रमाणे

**(डॉ. नितीन राऊत)**
**मंत्री ऊर्जा, महाराष्ट्र राज्य**

**प्रति,**
**प्रधान सचिव, (ऊर्जा)**
**महाराष्ट्र शासन,**
**मंत्रालय, मुंबई-32.**

Scanned with CamScanner

Government of India/Bharat Sarkar
Ministry of Power/Vidyut Mantralaya
Shram Shakti Bhawan, Rafi Marg, New Delhi
••••••••

Dated, the 4th April, 2020.

Dear Principal Secretary/Secretary (Power)

This is with reference to the appeal of the Hon. Prime Minister to the people to voluntarily switch off their lights at 9.00 PM on the 5th April, 2020. The National Load Despatch Centre has worked out the procedures for grid balancing during the period which they will be communicating to the Regional and State Load Despatch Centres separately. It is requested that the following may be brought to the notice of all concerned.

The appeal of the Honourable Prime Minister to the people is to voluntarily switch off only the lights at 9.00 PM on the 5th April, 2020. There is no call to switch off either streetlights or appliances like TVs, Refrigerators and ACs in homes. Adequate arrangements and protocols are in place to handle the variation in demand. People should be assured not to worry and continue running all the appliances as usual.

Local bodies may be advised to keep the street lights on so as to avoid any law and order problems.

The lights in hospitals and other essential services will remain on.

Detailed instructions are being issued by POSOCO.

Yours sincerely,

(Sanjiv Nandan Sahai)
Secretary to the Govt. of India
Ministry of Power
New Delhi.

To
All Principal Secretaries/Secretaries (Power)

Scanned with CamScanner

**Press Release**

The honourable Prime Minister has appealed to the people to voluntarily switch off their lights between 9:00 p.m to 9:09 pm on the 5th of April. Some apprehensions have been expressed that this may cause instability in the grid and fluctuation in voltage which may harm the electrical appliances. These apprehensions are misplaced.

The Indian electricity grid is robust and stable and adequate arrangements and protocols are in place to handle the variation in demand. The following may be noted:

The appeal of the Hon Prime Minister is to simply switch off the lights in their homes from 9 pm to 9.09 pm on the 5th of April. There is no call to switch off either street lights or appliances like Computers, TVs, Fans, Refrigerators and ACs in the homes. Only lights should be switched off.

The lights in Hospitals and all other essential services like Public Utilities, Municipal Services, Offices, Police Stations, Manufacturing Facilities, etc will remain on. The call given by Hon'ble PM is to just switch off lights in residences.

All local bodies have been advised to keep the street lights on for public safety.

*Ministry of Power Govt of India*

Scanned with CamScanner